**Miicrosoft Azure two days workshop news 2/05/2016**



प्रशिक्षण देण्याकरिता आलेले कंपनीचे पदाधिकारी व संस्थेचे अध्यक्ष.

# डिजिटल व्हिलेजबाबत अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रशिक्षण

**बडनेरा :** राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिग ॲन्ड मॅनेजमेंट या महाविद्यालयात मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या अधिकाऱ्यांव्दारे डिजिटल विलेज हरिसाल या सबंधिचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वेलफेअर सोसायटीने पुढाकार घेतला असून शासनाच्यावतीने या कंपनीची चमू महाविद्यालयात दाखल झाली आहे.

प्रशिक्षणाला संस्थेचे अध्यक्ष नितीन धांडे, विनय गोहाड, पंकज देशमुख, युवराजसिंग चौधरी, हेमंत देशमुख, नितीन हिवसे, उदय देशमुख, गजानन काळे, रागिणी देशमुख, एम. एस. अली यांनी सदिच्छा भेट देऊन या कार्यक्रमातून डिजिटल व्हिलेजसाठी लागणाऱ्या तांत्रिक बाबी कंपनीकडून शिकविण्यात येणार आहे.

संस्थेच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त विविध सामाजिक उपक्रम संस्थेतर्फे राबविण्यात येत आहे. त्यातील डिजिटल व्हिलेज हरिसालसाठी तांत्रिक मनुष्यबळाचे पाठबळ देणे हा त्यामागील उद्देश आहे. (शहर प्रतिनिधी)

# ‘डिजिटल विलेज हरिसाल’

**अमरावती/का.प्र.**

प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अ‍ॅन्ड मॅनेजमेंट व परमीट एन्ड आर या महाविद्यालयात मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या अधिकाऱ्याद्वारे ‘डिजिटल विलेज हरिसाल’ या संबंधिचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या संकल्पनेतुन महाराष्ट्रातील पहिले ‘डिजिटल विलेज हरिसाल’ यासाठी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीने पुढाकार घेण्यात आला. तसेच शासनाच्या वतीने मायक्रोसॉफ्ट या नामांकीत कंपनीची टीम महाविद्यालयात दाखल झाली असून विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीच्या दोन्ही अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.



प्रशिक्षणाला संस्थेचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, व कार्यकारी सदस्य प्रा.हेमंत देशमुख, नितीन हिवसे, अ‍ॅड. उदय देशमुख, प्रा.गजानन काळे, प्रा.रागिणी देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एस.अली यांनी सदिच्छा भेट प्राचार्य, डॉ. निशिकांत काळे यांनी दिली. सदर कार्यक्रमातुन डिजिटल विलेज साठी लागणाऱ्या तांत्रिक मायक्रोसॉफ्ट कंपनीकडुन शिकविण्यात येणार आहे संस्थेच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्य विविध सामाजिक उपक्रम संस्थेतर्फे राबविण्यात येत आहे. त्यातील डिजिटल विलेज हरिसाल साठी तांत्रिक मनुष्यबळाचे पाठबळ देणे हा त्यामागील उद्देश आहे.

सदर कार्यक्रम संस्थेच्या दोन्ही अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निशीकांत काळे प्राचार्य डॉ.एम.एस.अली यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.